प्रेसनोट

दिनांक २२/०७/२०२४

**''सहायक अभियंता, म.रा.वि.वि.क. विक्रमगड '' यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी लाच स्विकारताना ताब्यात घेतले बाबत''**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | विक्रमगड पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपीत लोकसेवक श्री. संदिप सगरसिंग जवाहर, वय ४९ वर्ष, सहाय्यक अभियंता (वर्ग–२), म.रा.वि.वि.क.विक्रमगड, जि.पालघर मुळ रा. प्लॉट न. ८८६/टि ६, शक्ती नगर, गुप्तेश्वर, जबलपुर शहर, मध्य प्रदेश** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ८,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ८,०००/–रूपये. |
| ७ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांनी त्यांच्या वडिलांच्या नावे नवीन दोन वीज मीटर कनेक्शन साठी सेक्शन कार्यालय, महावितरण विभाग, विक्रमगड यांच्याकडे अर्ज केले होते त्या अर्जानुसार स्थानिक वायरमेन यांनी स्थळ पाहणी रिपोर्ट तयार करून आलोसे श्री संदीप जवाहर, सहाय्यक अभियंता यांच्या सेक्शन कार्यालयाकडे सादर केला आहे. त्या अर्जावर कार्यवाही करण्याकरीता आलोसे श्री संदिप जवाहर यांनी तक्रारदार यांचेकडे ८,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २२/०७/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झाली.<br>तक्रारदार यानी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि २२/०७/२०२४ रोजी पंचासमक्ष आलोसे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्या वडिलांच्या नावे नवीन दोन वीज मीटर कनेक्शन साठी आज दिनांक २२/०७/२०२४ रोजी आलोसे यांनी ८,००० –रूपये लाचेची मागणी करून तक्रारदाराकडून ८,०००/– रूपये लाचेची रक्कम अधिकारी खानावळ, पंचायत समिती समोर जव्हार रोड, विक्रमगड येथे १९.२४ वाजता पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्विकारली असता आलोसे श्री संदिप जवाहर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहात पकडण्यात आले आहे |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dyspacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन – acbmaharashtra.net
टोल फ्री न '– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्सअॅप क्र. .– acbmaharashtra@mahapolice.gov.in


22/7/24

(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

Scanned with CamScanner